www.prepp.in

prepp
Your Personal Exams Guide

**MH SET 2013 MARATHI PAPER 3 FEBRUARY 17, 2013 QUESTION PAPER**

FEB – 01313/III

# Marathi
## Paper III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण 75 बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. कवी नरेंद्रकृत अठराशे ओव्यांचे 'रुक्मिणी स्वयंवर' कोणी संपादित केले ?
   (A) वि. भि. कोलते
   (B) रा. चिं. ढेरे
   (C) कृष्णदास महानुभाव
   (D) सुरेश डोळके

2. दशमस्कंधावर सव्वालक्ष ओव्यांचे भाष्यलेखन करणारा कवी कोण ?
   (A) विष्णुदासनामा
   (B) रमावल्लभदास
   (C) शिवकल्याण
   (D) महालिंगदास

3. 'पंचसुधा' या रचनेचा कर्ता कोण ?
   (A) वामनपंडित
   (B) श्रीधर
   (C) मुक्तेश्वर
   (D) रघुनाथपंडित

4. काव्यचरण आणि कवी यांच्या जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | हटातटाने पटा रंगवुन जटाधरिशी का शिरी मठाची उठाठेव का करी | (5) | अनंतफंदी |
| (2) | घन: श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला | (6) | सगनभाऊ |
| (3) | दळणासारखे किडे रगडले रडती नरनारी | (7) | रामजोशी |
| (4) | धन्य तुझे लावण्य | (8) | परशुराम |
| | | (9) | होनाजी |

   (A) (1)—(8), (2)—(6), (3)—(7), (4)—(9)
   (B) (1)—(7), (2)—(9), (3)—(6), (4)—(5)
   (C) (1)—(9), (2)—(8), (3)—(5), (4)—(6)
   (D) (1)—(5), (2)—(7), (3)—(9), (4)—(8)

[P.T.O.

www.prepp.in



5. "ईश्वरे यश दिले तरी उत्तम, नाही तरी पुन: तुमची आमची भेट स्वर्गी होईल." हे निर्वाणीचे उद्गार कोणत्या बखरीतील आहेत ?

(A) भाऊसाहेबांची बखर

(B) होळकरांची कैफियत

(C) पानिपतची बखर

(D) महिकावतीची बखर

6. 'सुहृद्‌चंपा' हे कोणत्या कवीचे टोपणनाव आहे ?

(A) सदानंद रेगे

(B) पु. शि. रेगे

(C) पुरुषोत्तम पाटील

(D) पद्मा गोळे

7. जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | तरुणी शिक्षण नाटिका | (5) | विष्णुदास भावे |
| (2) | नाट्यकविता संग्रह | (6) | वि.ज. कीर्तने |
| (3) | थोरले माधवराव पेशवे | (7) | श्री. कृ. कोल्हटकर |
| (4) | जन्म रहस्य | (8) | कृ.प्र. खाडिलकर |
| | | (9) | नारायण बापूजी कानिटकर |

(A) (1)—(9), (2)—(5), (3)—(6), (4)—(7)

(B) (1)—(6), (2)—(7), (3)—(9), (4)—(8)

(C) (1)—(8), (2)—(9), (3)—(5), (4)—(7)

(D) (1)—(9), (2)—(8), (3)—(7), (4)—(6)

www.prepp.in



8. पुढीलपैकी कादंबरीत्रय लिहिणारा लेखक कोण ?
   (A) कमल देसाई
   (B) रंगनाथ पठारे
   (C) वसंत वरखेडकर
   (D) त्र्यं.वि. सरदेशमुख

9. पुढीलपैकी कोणता कथासंग्रह श्री. दा. पानवलकरांचा **नाही** ?
   (A) जांभूळ
   (B) मुखवटे
   (C) गजगा
   (D) औदुंबर

10. 'चंद्रास्त' हा संग्रह कोणाचा आहे ?
   (A) गौरी देशपांडे
   (B) आनंदीबाई शिर्के
   (C) कुसुमावती देशपांडे
   (D) दुर्गा भागवत

11. संस्कृत, ग्रीक व लॅटिन या भाषांमधील साम्यस्थळे यादृच्छिक नसून या भाषांमागे एकच जनक भाषा असावी, असा तर्क कोणी मांडला ?
   (A) येस्पर्सन
   (B) चॉम्स्की
   (C) सर विल्यम जोन्स
   (D) पाणिनी

12. वेगवेगळ्या स्वनांमध्ये जर स्वनिम साम्य असेल आणि ते स्वन जर व्यवच्छेदक नसतील, म्हणजेच त्यांचे वितरण वैधर्म्ययुक्त नसेल, तर त्यांना एकाच स्वनिमाची स्वनांतरे असे म्हणण्यात येते :
   (A) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक
   (B) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर
   (C) संपूर्ण विधान बरोबर
   (D) संपूर्ण विधान चूक

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



13. पदरचनांचे वर्गीकरण करताना ज्या रचनांमध्ये प्रथमोपस्थित घटकांपैकी एक घटक प्रमुख असतो व त्या घटकाचे त्या संपूर्ण रचनेच्या जागी प्रतियोजन करता येते, अशा रचनेला काय म्हणतात ?

(A) अंत:पदप्रधान रचना

(B) अन्य पद प्रधान रचना

(C) विस्तार

(D) पदस्वनिमिक उपव्यवस्था

14. उपवाक्ये 'किंवा', 'अथवा', 'अगर' या अव्ययांनी जोडली असल्यास त्या संयुक्त वाक्याला काय म्हणतात ?

(A) परिणामबोधक संयुक्त वाक्य

(B) समुच्चयबोधक संयुक्त वाक्य

(C) विकल्पबोधक संयुक्त वाक्य

(D) न्यूनत्वबोधक संयुक्त वाक्य

15. शब्द आणि भाषा यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | पोषाख | (5) | गुजराती |
| (2) | ठहराव | (6) | फ्रेंच |
| (3) | लुगडे | (7) | हिंदी |
| (4) | कूपन | (8) | उर्दू |
| | | (9) | फार्शी |

(A) (1)—(9), (2)—(7), (3)—(5), (4)—(6)

(B) (1)—(5), (2)—(6), (3)—(8), (4)—(9)

(C) (1)—(6), (2)—(7), (3)—(9), (4)—(8)

(D) (1)—(8), (2)—(9), (3)—(5), (4)—(7)

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



16. चिकटणे > चिटकणे, फलाहार > फराळ, डोकसे > डोसके या उदाहरणांतील स्वनशृंखलांतील लगतचे स्वन परस्परांची जागा घेतात या स्वनपरिवर्तन प्रक्रियेला काय म्हणतात ?

(A) विसदृशीकरण

(B) स्वनव्यत्यास

(C) सदृशीकरण

(D) सदृशस्वनलोप

17. अळमटळम, सटरफटर, जळजळ, लगबग हे शब्द पुढीलपैकी कोणत्या प्रकारचे आहे ?

(A) अंत:पदप्रधान

(B) विकल्पबोधक

(C) अंशाभ्यस्त

(D) समानाधिकरण

18. 'जनन' ही संकल्पना मानवी कुलांना जशी तंतोतंत लागू पडते, तशी भाषाकुलांना लागू पडणार **नाही** :

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध बरोबर, उत्तरार्ध चूक

(D) पूर्वार्ध चूक, उत्तरार्ध बरोबर

19. पुढीलपैकी कोणता शब्द हळबी बोलीतील **नाही** ?

(A) कपरा

(B) आखीन

(C) मुइ

(D) अभाय

www.prepp.in



20. शब्द व शब्दप्रकार यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) कन्या व मुलगी | (5) विरुद्धार्थी शब्द |
| (2) उजेड व अंधार | (6) समानार्थी शब्द |
| (3) ओढणे | (7) अर्थसमावेशक क्रियापद |
| (4) फुगणे | (8) भिन्नार्थी शब्द |
| | (9) अनेकार्थी क्रियापद |

(A) (1)—(6), (2)—(7), (3)—(8), (4)—(5)

(B) (1)—(7), (2)—(9), (3)—(8), (4)—(6)

(C) (1)—(9), (2)—(6), (3)—(7), (4)—(5)

(D) (1)—(6), (2)—(5), (3)—(9), (4)—(7)

21. दण्डीच्या ग्रंथाचे नाव काय ?

(A) काव्यादर्श

(B) काव्यालंकार

(C) काव्यानुशासन

(D) अलंकारसर्वस्व

22. ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | |
|---|---|
| (1) भारतीय साहित्यशास्त्र | (5) द.के. केळकर |
| (2) प्राचीन काव्यशास्त्र | (6) र. पं. कंगले |
| (3) काव्यालोचन | (7) ग. त्र्यं. देशपांडे |
| (4) रसविमर्श | (8) रा. श्री. जोग |
| | (9) के. ना. वाटवे |

(A) (1)—(5), (2)—(6), (3)—(9), (4)—(8)

(B) (1)—(7), (2)—(6), (3)—(5), (4)—(9)

(C) (1)—(5), (2)—(8), (3)—(6), (4)—(7)

(D) (1)—(5), (2)—(7), (3)—(8), (4)—(9)

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



23. प्रतिभेच्या संदर्भात दर्शना आणि वर्णना हा भेद कोणी केला ?

(A) दण्डी

(B) भट्टतौत

(C) रुद्रट

(D) जगन्नाथपंडित

24. रसाच्या संदर्भात उपचित स्थायी म्हणजे रस, ही कल्पना कोणी मांडली ?

(A) भट्टलोल्लट

(B) अभिनवगुप्त

(C) भट्टनायक

(D) भट्टतौत

25. 'भाले प्रवेश करतात' (कुन्त: प्रवेशन्ति) हे विधान लक्षणेच्या कोणत्या प्रकारातील आहे ?

(A) गौणी सारोपा

(B) शुद्धा सारोपा

(C) शुद्धा उपादान

(D) शुद्धा लक्षण-लक्षणा

26. मराठीमध्ये कांटवर भाष्य कोणी लिहिले आहे ?

(A) मिलिंद मालशे

(B) दि. के. बेडेकर

(C) रा. भा. पाटणकर

(D) अशोक जोशी

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



27. प्रेरणा संतुलनाचा सिद्धान्त कोणी मांडला ?

(A) आय. ए. रिचर्डस्

(B) विल्यम एम्पसन

(C) एफ. आर. लेविस

(D) रेनेवेलेक

28. पुढील ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | टीकाविवेक | (5) | भालचंद्र नेमाडे |
| (2) | टीकास्वयंवर | (6) | वा.भा. पाठक |
| (3) | टीकाहरण | (7) | श्री. के. क्षीरसागर |
| (4) | टीका आणि टीकाकार | (8) | श्रीधर तिळवे |
| | | (9) | दि. के. बेडेकर |

(A) (1)—(9), (2)—(6), (3)—(5), (4)—(8)

(B) (1)—(5), (2)—(9), (3)—(8), (4)—(6)

(C) (1)—(6), (2)—(5), (3)—(7), (4)—(8)

(D) (1)—(7), (2)—(5), (3)—(8), (4)—(6)

29. नियमोल्लंघनाची संकल्पना कोणी मांडली ?

(A) विल्यम एम्पसन

(B) जोनाथन कलर

(C) रोमान याकोबसन

(D) यॅन मुकॉरोव्हस्की

30. संकल्पना आणि वाद यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | पाया-इमारत | (5) | अतिवास्तववाद |
| (2) | स्वतंत्र निवड | (6) | वास्तववाद |
| (3) | स्वयंचलित लेखन | (7) | मार्क्सवाद |
| (4) | आत्माविष्कार | (8) | अस्तित्ववाद |
| | | (9) | रोमँटिसिझम |

(A) (1)—(7), (2)—(8), (3)—(5), (4)—(9)

(B) (1)—(7), (2)—(5), (3)—(6), (4)—(8)

(C) (1)—(6), (2)—(5), (3)—(8), (4)—(7)

(D) (1)—(9), (2)—(7), (3)—(5), (4)—(6)

www.prepp.in



31. साहित्यप्रकार/कलाप्रकार ही संकल्पना नाकारणारा सौंदर्यमीमांसक कोण ?

(A) आर. जे. कॉलिंगवूड

(B) बेनेदेत्तो क्रोचे

(C) ए. एफ. कॅरिट

(D) क्लाइव्हबेल

32. अनुकृतीचे विषय आणि अनुकृतीच्या पद्धती यांवरून साहित्याचे वर्गीकरण कोणी केले ?

(A) लाँजायनस

(B) प्लेटो

(C) होरेस

(D) ॲरिस्टॉटल

33. 'सेंद्रिय एकात्मता' हे तत्व कोणत्या साहित्यप्रकाराबाबत गाभ्याचे म्हणता येईल ?

(A) कादंबरी

(B) नाटक

(C) कथा

(D) कविता

34. पुढीलपैकी कोणता लेखनप्रकार साहित्यप्रकार असण्याविषयी साशंकता व्यक्त केली जाते ?

(A) कविता

(B) कादंबरी

(C) कथा

(D) चरित्र

www.prepp.in
prepp Your Personal Exams Guide



35. सम्यक कृती म्हणजे 'संस्कृती', ही व्याख्या कोणाची ?

(A) दुर्गा भागवत

(B) वसंत आबाजी डहाके

(C) आ. ह. साळुंखे

(D) रा.ग. जाधव

36. 'सुखकर्ता दु:खहर्ता वार्ता विघ्नाची'—ह्या आरतीचे कवी कोण ?

(A) संत नामदेव

(B) विष्णूकवी

(C) जनीजनार्दन

(D) समर्थ रामदास

37. अव्वल इंग्रजी कालखंडातील कोणत्या नियतकालिकात 'मराठी भाषेत सर्व विषयांचा संग्रह' अशी संपादकीय टीप नमूद करण्यात आली आहे ?

(A) इंदुप्रकाश

(B) ज्ञानप्रकाश

(C) दिग्दर्शन

(D) सर्वसंग्रह

38. जोड्या जुळवा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | मराठी व्याकरणाचे पाणिनी | (5) | विष्णुशास्त्री चिपळूणकर |
| (2) | मराठी भाषेचे शिवाजी | (6) | लोकमान्य टिळक |
| (3) | भारतीय असंतोषाचे जनक | (7) | जगन्नाथ शंकरशेठ |
| (4) | सुधारणावाद्यांचे पितामह | (8) | दादोबा पांडुरंग |
| | | (9) | महात्मा फुले |

(A) (1)—(5), (2)—(8), (3)—(7), (4)—(6)

(B) (1)—(8), (2)—(5), (3)—(6), (4)—(7)

(C) (1)—(5), (2)—(8), (3)—(7), (4)—(6)

(D) (1)—(8), (2)—(6), (3)—(5), (4)—(7)

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



39. साहित्याचा, कलेचा सामाजिक दृष्टिकोनातून शास्त्रीय विचार करणारी एक महत्वाची पद्धती म्हणून मार्क्सवादाविषयीचे आकलन करून घेता येते व त्यात त्यांच्या विचारातील 'परिस्थिती' या घटकाचा नेमका अर्थ आढळतो :

(A) या विधानाचा पूर्वार्ध बरोबर आहे

(B) या विधानाचा उत्तरार्ध बरोबर आहे

(C) संपूर्ण विधान बरोबर आहे

(D) संपूर्ण विधान चुकीचे आहे

40. गोव्यातील समृद्ध निसर्गाचा बा.भ. बोरकरांच्या प्रतिमासृष्टीवर परिणाम झालेला असला तरी, त्यांच्या कवितेचे विषय मात्र गोव्यापुरते सीमित नव्हते :

(A) संपूर्ण विधान बरोबर

(B) संपूर्ण विधान चूक

(C) पूर्वार्ध चूक पण उत्तरार्ध बरोबर

(D) उत्तरार्ध चूक पण पूर्वार्ध बरोबर

41. वाङ्मयव्यवहारात पुढीलपैकी कोणता घटक वाङ्मयीन अभिरुचीच्या संदर्भात महत्वाचा **नाही** ?

(A) लेखक

(B) प्रसिद्धी माध्यमे

(C) वितरक

(D) प्रकाशक

42. पुढीलपैकी कोणत्या विचारवंताने वैज्ञानिकदृष्टीचा विशेष आग्रह धरला ?

(A) वि. दा. सावरकर

(B) लोकहितवादी

(C) विठ्ठल रामजी शिंदे

(D) महात्मा फुले

www.prepp.in



43. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालीलपैकी कोणते नियतकालिक लोकांच्या प्रबोधनासाठी सुरू केले ?

(A) समतासंगर

(B) समता

(C) समाजप्रबोधन

(D) जनता

44. छत्रपती शिवाजी महाराजांच्या उदयाच्या पार्श्वभूमीची ग्रंथरूप मीमांसा करणारे अव्वल इंग्रजीतील महत्वाचे विचारवंत कोण ?

(A) कृष्णशास्त्री चिपळूणकर

(B) विष्णुबुवा ब्रह्मचारी

(C) न्यायमूर्ती रानडे

(D) विष्णुशास्त्री चिपळूणकर

45. नियतकालिके व संपादक यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) सत्यकथा | (5) पु.शि. रेगे |
| (2) छंद | (6) राम पटवर्धन |
| (3) मनोरंजन | (7) का. र. मित्र |
| (4) अस्मितादर्श | (8) गंगाधर पानतावणे |
| | (9) पुरुषोत्तम पाटील |

(A) (1)—(5), (2)—(6), (3)—(9), (4)—(7)

(B) (1)—(9), (2)—(7), (3)—(8), (4)—(6)

(C) (1)—(7), (2)—(6), (3)—(9), (4)—(5)

(D) (1)—(6), (2)—(5), (3)—(7), (4)—(8)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



46. पुढीलपैकी कोण अनियतकालिकांच्या चळवळीशी संबंधित **नाही** ?

(A) सतीश काळसेकर

(B) अशोक शहाणे

(C) भालचंद्र नेमाडे

(D) विलास सारंग

47. 'अबकडइ' या अनियतकालिकाचे संपादक कोण ?

(A) भालचंद्र नेमाडे

(B) अशोक शहाणे

(C) चंद्रकांत पाटील

(D) चंद्रकांत खोत

48. भक्तिसाहित्याच्या चळवळीमुळे आपसुक निर्माण झाली ती :

(A) भाषाशुद्धी

(B) आध्यात्मिक लोकशाही

(C) राष्ट्रभक्ती

(D) ग्रामीण साहित्याभिरुची

49. 'सुरेश' ही व्यक्तिरेखा कोणत्या कादंबरीतील आहे ?

(A) रणांगण

(B) कोसला

(C) एन्कीच्या राज्यात

(D) बिढार

www.prepp.in



50. 'किडलेली माणसे' या कथेतील वातावरण कोणत्या स्वरूपाच्या वास्तुपरिसरात घडते ?

(A) बंगला

(B) हवेली

(C) चाळ

(D) सदनिका सोसायटी

51. भारतीय लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ करणारा पाश्चात्य अभ्यासक कोण ?

(A) कर्नल जेम्स

(B) कर्नल टॉड

(C) रेव्हरंड हिलॉप

(D) जेम्स फ्रेझर

52. कथेतील पात्रे, कथेची अभिवृद्धी, अभिवृद्धीला पूरक साधने, संपूर्ण घटना हे लोककथेचे चार मूल घटक असतात, असे कोणाचे मत आहे ?

(A) मॅक ॲवार्ड

(B) ऑल्बर्ड लॉर्ड

(C) सर रिचर्ड टेंपल

(D) लिंडा डेज

53. भराडी लोक कोणत्या वाद्याच्या साथीवर गाणी म्हणतात ?

(A) डमरू

(B) हालगी

(C) संबळ

(D) चिपळ्या

www.prepp.in



54. ध्रुवपद आणि पालुपद ही लोककथागीताची प्रधान तत्वे आहेत, असे मत कोणी मांडले ?

(A) एडवर्ड क्लॉड

(B) गूमर

(C) अल्बर्ट वॅसल्स्की

(D) मिलर

55. ग्रंथ व ग्रंथकारांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | लोकसंचित | (5) | डॉ. प्रभाकर मांडे |
| (2) | लोकसाहित्याचे अंत:प्रवाह | (6) | दुर्गा भागवत |
| (3) | लोकसंस्कृतीचे उपासक | (7) | डॉ. सरोजिनी बाबर |
| (4) | लोकसाहित्याची रूपरेषा | (8) | डॉ. तारा भवाळकर |
| | | (9) | रा.चिं. ढेरे |

(A) (1)—(7), (2)—(5), (3)—(8), (4)—(9)

(B) (1)—(8), (2)—(6), (3)—(5), (4)—(7)

(C) (1)—(8), (2)—(5), (3)—(9), (4)—(6)

(D) (1)—(8), (2)—(7), (3)—(6), (4)—(5)

56. अनुवादाचा उद्देश हा आपल्या वैश्विक अनुभवात इतरांना सामील करून घेण्याच्या प्रेरणेत आहे हे मत कोणाचे आहे ?

(A) निशिकांत मिरजकर

(B) काझी सलीम

(C) विलास सारंग

(D) मिलिंद मालशे

57. वसाहतकाळात पौर्वात्य संस्कृती ही युरोपच्या दृष्टीने केवळ एक उपभोग्य वस्तू होती, हा विचार कोणी मांडला ?

(A) एडवर्ड सैद

(B) गायत्री स्पीवॉक

(C) फेनॉन

(D) गणेश देवी

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



58. प्रभाव हा नवी व्यवस्था निर्माण करत नाही तर तो जुन्या व्यवस्थेला अनुसरणारा असतो, असे कोणी म्हटले आहे ?

(A) चंद्रशेखर जहागिरदार

(B) वसंत बापट

(C) आनंद पाटील

(D) भालचंद्र नेमाडे

59. पुढीलपैकी इब्सेनच्या 'एनिमी ऑफ दि पीपल' चा अनुवाद कोणी केला **नाही** ?

(A) ह. रा. महाजनी

(B) अशोक शहाणे

(C) श्री. वि. वर्तक

(D) नाना खाडिलकर

60. पुढील कथासंग्रह व अनुवादक यांच्या जोड्या लावा :

| | | | |
|---|---|---|---|
| (1) | कन्नड नवकथा | (5) | उमा कुलकर्णी |
| (2) | मायामृग | (6) | माधव कानिटकर |
| (3) | सातसगर | (7) | शांता बुद्धिसागर |
| (4) | जयकांथन | (8) | दत्ता भगत |
| | | (9) | अ.रा. तोरे |

(A) (1)—(6), (2)—(9), (3)—(7), (4)—(5)

(B) (1)—(9), (2)—(5), (3)—(8), (4)—(6)

(C) (1)—(6), (2)—(9), (3)—(7), (4)—(8)

(D) (1)—(9), (2)—(7), (3)—(5), (4)—(6)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



61. वंशवादात कृष्णवर्णीय स्त्रीची भूमिका इतर स्त्रीपेक्षा वेगळी राहील ही भूमिका कोणत्या अभ्यासकाने मांडली ?

(A) बेल हुक्स

(B) लयूरी इरिगारे

(C) एलेश शोवाल्टर

(D) सिमान द बोवा

62. "नुसती स्त्री-पुरुष समानता आणि स्त्रीमुक्तीवादच नव्हे तर पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची सर्वांगीण श्रेष्ठता यांची मी ठाम पुरस्कर्ती आहे." असे विधान कोणी केले आहे ?

(A) कमल देसाई

(B) गीता साने

(C) गौरी देशपांडे

(D) मेघना पेठे

63. पुढीलपैकी कोणता ग्रंथ जहाल स्त्रीवादी विचाराचा आरंभ बिंदू मानला जातो ?

(A) टूवर्डस् फेमिनिस्ट पोएटिक्स

(B) दि फिमेल यूनक

(C) दि फेमिनी मिस्टिक

(D) सेक्शुअल पॉलिटिक्स

64. पुढीलपैकी कोणते नियतकालिक स्त्रीप्रश्नांना वाहिलेले **नाही** ?

(A) बायजा

(B) दिशा

(C) प्रेरक ललकारी

(D) अनुबंध

www.prepp.in
Prepp Your Personal Exams Guide



65. आत्मचरित्रे व लेखिका यांच्या जोड्या जुळवा :

(1) माझी कहाणी (5) लीला चिटणीस

(2) माझे पुराण (6) बाया कर्वे

(3) चंदेरी दुनियेत (7) कुमुद पावडे

(4) अंत:स्फोट (8) पार्वतीबाई आठवले

(9) दुर्गा भागवत

(A) (1)—(5), (2)—(7), (3)—(6), (4)—(8)

(B) (1)—(8), (2)—(6), (3)—(5), (4)—(7)

(C) (1)—(7), (2)—(9), (3)—(8), (4)—(5)

(D) (1)—(6), (2)—(7), (3)—(9), (4)—(5)

66. कादंबरीकार व कादंबरी यांच्या जोड्या जुळवा :

(1) शंकर पाटील (5) बारी

(2) बाजीराव पाटील (6) शितू

(3) रणजित देसाई (7) भंडारवाडी

(4) गो.नी. दांडेकर (8) टारफुला

(9) दूर गेलेले घर

(A) (1)—(7), (2)—(6), (3)—(9), (4)—(5)

(B) (1)—(8), (2)—(7), (3)—(5), (4)—(6)

(C) (1)—(9), (2)—(5), (3)—(8), (4)—(7)

(D) (1)—(5), (2)—(6), (3)—(9), (4)—(8)

www.prepp.in



67. पुढीलपैकी कोणता साहित्यिक ग्रामीण साहित्य चळवळीशी संबंधित **नाही** ?

(A) आनंद यादव

(B) भास्कर चंदनशिव

(C) वासुदेव मुलाटे

(D) सखा कलाल

68. धरणग्रस्तांचे प्रश्न अधोरेखित करणारी कादंबरी कोणती ?

(A) मेलेलं पाणी

(B) गोतावळा

(C) पाणकळा

(D) काळी आई

69. 'शेतकरी कादंबरीकार' असे कोणत्या लेखकाने स्वत:ला संबोधले आहे ?

(A) आनंद यादव

(B) र.वा. दिघे

(C) रा.रं. बोराडे

(D) चंद्रकुमार नलगे

70. 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध' या समीक्षा ग्रंथाचे लेखक कोण ?

(A) आनंद यादव

(B) नागनाथ कोत्तापल्ले

(C) वासुदेव मुलाटे

(D) रा. रं. बोराडे

71. 'येळकोट' या कथासंग्रहाचे लेखक कोण ?

(A) उर्मिला पवार

(B) अमिताभ

(C) वामन होवाळ

(D) शरणकुमार लिंबाळे

www.prepp.in
Prepp
Your Personal Exams Guide



72. भगवान इंगळे यांचे आत्मकथन कोणते ?
   (A) फांजर
   (B) ढोर
   (C) सोनजातक
   (D) टाच

73. कालच तो गुहेच्या तोंडाशी
   ठेवून गेला पिसाळलेला जाळ
   मी शिलगावीत जाणार आहे
   या पुढचा काळ
   —या काव्यपंक्ती कोणाच्या ?
   (A) नामदेव ढसाळ
   (B) यशवंत मनोहर
   (C) ज. वि. पवार
   (D) लोकनाथ यशवंत

74. 'आंबेडकरी चळवळ : परिवर्तनाचे संदर्भ' हा ग्रंथ कोणाचा ?
   (A) रावसाहेब कसबे
   (B) प्रकाश खरात
   (C) यशवंत मनोहर
   (D) अविनाश डोळस

75. ग्रंथ आणि ग्रंथकार यांच्या जोड्या जुळवा :

| | |
|---|---|
| (1) मूल्यवेध | (5) प्रभाकर मांडे |
| (2) दलित साहित्य : एक आकलन | (6) गंगाधर पानतावणे |
| | (7) बाबूराव बागूल |
| (3) दलित साहित्याचे निराळेपण | (8) बाळकृष्ण कवठेकर |
| (4) दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर | (9) दत्ता भगत |

   (A) (1)—(6), (2)—(8), (3)—(5), (4)—(9)
   (B) (1)—(9), (2)—(5), (3)—(6), (4)—(7)
   (C) (1)—(8), (2)—(7), (3)—(9), (4)—(5)
   (D) (1)—(5), (2)—(6), (3)—(7), (4)—(8)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



**ROUGH WORK**

prepp
Your Personal Exam Guide

Prepp
Your Personal Exams Guide



## ROUGH WORK

Prepp Your Personal Exam Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**M**

# Paper-III
# MARATHI

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

2. (Signature) ..........................................

(Name) ..........................................

Seat No. [ ]

(In figures as in Admit Card)

Seat No. ..........................................

(In words)

OMR Sheet No. [ ]

(To be filled by the Candidate)

## FEB - 01313

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **24** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी आवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**